महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

'बालभारती', पुणे

सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ००४.

## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

# नागरिकांची सनद

महाराष्ट्र राज्य
पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.

# बालभारती

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य आणि भारतातील सर्व राज्यांच्या आर्थिक विकासात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तळागाळातील, ग्रामीण/डोंगरी, अतिदुर्गम मागास भागातील विभाग कार्यक्रम राबवण्यासाठी आवश्यक असाणाऱ्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना आवश्यक ते मार्गदर्शन करुन, त्यांना सक्षम करुन, मनुष्यबळ वाढवून आपल्या पाल्यास शाळेत पाठवण्यास उद्युक्त करुन, त्यांच्यात मानसिक बळ निर्माण करण्याचे शिक्षण हे मुख्य साधन आहे. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील प्राथमिक शिक्षणाची महत्त्वाची भूमिका लक्षात घेवून प्राथमिक स्तरावरील शिक्षणविषयक कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहचवले जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच महाराष्ट्र राज्य शासनाचा शालेय शिक्षण विभाग आपल्या एकूण वित्तीय महसूल खर्चापैकी साधारणपणे १/५ भाग सर्वसाधारणपणे प्राथमिक तथा माध्यमिक शिक्षणावर खर्च करतो.

शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यातील विविध शैक्षणिक योजनांची आखणी, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, वय वर्ष ६ ते १४ या वयोगटाच्या सर्व मुलां–मुलींना शिक्षणासाठीची इ. १ ली ते इ. ८ वी ची १० भाषांतील, इ. ९ वी व इ. १० वी ची ८ भाषांतील तसेच इ. ११ वी व इ. १२ वीच्या कला व वाणिज्य शाखेकरता दोन भाषातील व विज्ञान शाखेच्या इंग्रजी भाषेतील पुस्तकांची क्रमिक पुस्तके तयार करुन ती उपलब्ध करुन वेळेत पुरवठा करण्याचे शासनाचे घटनात्मक दायित्व आणि राज्याचे धोरण इत्यादी मार्गदर्शक तत्त्वे समोर ठेवून करण्यात आली आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण स्तराचा यामध्ये समावेश होता. या प्रत्येक स्तरावर आवश्यक त्या सर्व पायाभूत सोयी उपलब्ध करणे, मानवी घटक आर्थिकदृष्ट्या सबळ करणे आणि जीवनाचा दर्जा वाढवणे यांना प्राथमिक शिक्षणामध्ये प्राधान्य आहे.

# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,

## 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.

### १. मंडळाची स्थापना

कोठारी आयोगाच्या शिफारशींनुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाची स्थापना २७ जानेवारी, १९६७ रोजी झाली. शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पहिली ते बारावी या इयत्तांसाठी आवश्यक ती पाठ्यपुस्तके, तसेच अन्य शैक्षणिक साहित्य राज्यात सर्वांकरिता प्रकाशित करणे, हे मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

पाठ्यपुस्तक मंडळाची स्थापना होण्यापूर्वी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम प्रामुख्याने खासगी प्रकाशकांच्याद्वारे होत असे; परंतु कोठारी आयोगाच्या सर्व शिफारशी महाराष्ट्र शासनाने स्वीकारल्यानंतर या कामासाठी देशात विशेष स्वायत्त संस्था स्थापन व्हाव्या, हा विचार पुढे आला. या विचारातून महाराष्ट्र राज्यात '**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ**' ही स्वायत्त संस्था दिनांक २७ जानेवारी, १९६७ रोजी स्थापन करण्यात आली व 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११००४ येथे मुख्यालय ठेवण्यात येऊन या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६९ व पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अनुसार करण्यात आली. मंडळाचे कामकाज '**ना नफा ना तोटा**' या तत्त्वावर चालते.

### २. मंडळाची प्रमुख उद्दिष्टे

(१) सर्वसामान्यपणे शिक्षणाच्या विकासासाठी व विशेषत: शालेय शिक्षणाच्या अभिवृद्धीसाठी साहाय्य व उत्तेजन देणे.

(२) शालेय पाठ्यपुस्तके, शिक्षकांकरिता हस्तपुस्तिका व विद्यार्थ्यांसाठी स्वाध्यायपुस्तिका यांसारख्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे. त्याचप्रमाणे अध्ययन व अध्यापन प्रगत होण्याच्या दृष्टीने उपयुक्त असे अन्य शैक्षणिक साहित्य तयार करणे.

(३) मंडळाने तयार केलेली पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य यांची छपाई करून ती प्रकाशित करणे व त्यांचा साठा, वितरण व विक्री यांची व्यवस्था करणे.

(४) शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमासंबंधी व पाठ्यपुस्तकांसंबंधी हाती घेतल्या जाणाऱ्या संशोधन प्रकल्पांना अनुदान देऊन साहाय्य करणे व मार्गदर्शन करणे.

(५) शासनाच्या शैक्षणिक ध्येय-धोरणांच्या परिपूर्ततेसाठी आवश्यक ते उपक्रम राबवणे.

### ३. पाठ्यपुस्तक मंडळाचे व्यवस्थापन

महाराष्ट्र राज्याचे **माननीय शालेय शिक्षणमंत्री** हे मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष व **माननीय राज्यमंत्री, शालेय शिक्षण** हे पदसिद्ध उपाध्यक्ष असतात. शिक्षण विभागातील शिक्षण संचालक या

पदाशी समकक्ष असणारे एक अधिकारी हे मंडळाचे संचालक असतात. मंडळाच्या सर्व व्यवहारांचे संपूर्ण व्यवस्थापन **नियामक मंडळाकडे** सोपवण्यात आले आहे. मंडळ हे व्यवस्थापनाचे कार्य संस्थापन समयलेखातील तरतुदींनुसार पार पाडत असते.

नियामक मंडळास साहाय्य करण्याकरिता मंडळाच्या संस्थापन समयलेखाप्रमाणे पुढील साहाय्यक समित्या स्थापित करण्यात आलेल्या आहेत.

(१) विद्या परिषद
(२) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक संशोधन सल्लागार परिषद
(३) पाठ्यपुस्तक निर्मिती व वितरण परिषद
(४) वित्त समिती
(५) कार्यकारी समिती

नियामक मंडळ व या सर्व समित्या संस्थापन समयलेखात विहित केल्याप्रमाणे कार्ये व कर्तव्ये पार पाडतात.

## ४. मंडळाची प्रशासकीय रचना

मंडळाचे मुख्य कार्यालय, विभागीय कार्यालय व भांडारांमध्ये कायमस्वरूपी अधिकारी व कर्मचारी आहेत. मंडळाचे संचालक हे शिक्षण विभागातून परसेवेवर आलेले संचालक दर्जाचे अधिकारी असून ते मंडळाचे कार्यकारी अधिकारी आहेत. वित्त व लेखा अधिकारी व अंतर्गत लेखापरीक्षण अधिकारी हे महालेखाकार, मुंबई किंवा लेखा व कोषागार, महाराष्ट्र राज्य, मुंबई यापैकी ज्या कार्यालयाकडून प्रथम अधिकारी उपलब्ध होतील असे परसेवेवर आलेले अधिकारी असतात.

मंडळाचे कामकाज चालवण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तक मंडळात पुढील विविध विभाग कार्यरत आहेत.

- विद्या विभाग, पुणे
- निर्मिती विभाग, पुणे
- वित्त विभाग, पुणे
- प्रशासन विभाग, पुणे
- स्थावर विभाग, पुणे
- विधी व माहिती विभाग, पुणे
- अंतर्गत लेखापरीक्षण विभाग, पुणे
- संशोधन विभाग, पुणे
- वितरण विभाग, पुणे
- संगणक विभाग, पुणे
- ग्रंथालय विभाग, पुणे

- किशोर विभाग, पुणे

## ५. विद्या विभाग

- शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित प्राथमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकांची व इतर साहित्यांची निर्मिती हे मंडळाचे प्रधान उद्‌दिष्ट आहे. ही पाठ्यपुस्तके, स्वाध्यायपुस्तिका तसेच इतर आनुषंगिक शैक्षणिक साहित्य तयार करण्याचे काम मंडळाच्या विद्या विभागातील भाषा व भाषेतर विभागांमार्फत करण्यात येते. या प्रक्रियेत पुढीलप्रमाणे विभाग कार्यरत आहेत.
- **भाषा विभाग :** १. मराठी, २. हिंदी, ३. इंग्रजी, ४. उर्दू, ५. गुजराती, ६. सिंधी
- ७. कन्नड, ८. तेलुगु.
- **भाषेतर विभाग :** १. गणित, २. शास्त्र, ३. इतिहास व राज्यशास्त्र, ४. भूगोल,
- ५. कार्यानुभव, ६. आरोग्य व शारीरिक शिक्षण, ७. कला.
- इयत्ता पहिली ते बारावीच्या ९००पेक्षा अधिक शीर्षकांची पाठ्यपुस्तके मंडळ तयार करते. यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगु, सिंधी, बंगाली व तमिळ अशा दहा भाषा माध्यमांत तयार होणाऱ्या पाठ्यपुस्तकांचा व स्वाध्यायपुस्तिकांचा समावेश आहे. त्यामध्ये मातृभाषा, अनिवार्य इंग्रजी, अनिवार्य मराठी तसेच इतर द् वितीय, तृतीय भाषा विषयांची आणि गणित, विज्ञान, इतिहास व नागरिकशास्त्र, इतिहास व राज्यशास्त्र, भूगोल या भाषेतर विषयांची पाठ्यपुस्तके तयार केली जातात. त्याचप्रमाणे कला, कार्यानुभव, माहिती तंत्रज्ञान, आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांसाठी पाठ्यपुस्तके व शिक्षक हस्तपुस्तिका तयार केल्या जातात.
- सन २०१६-२०१७पासून पाठ्यपुस्तक मंडळामार्फत माध्यमिक स्तरावरील तर सन २०१९-२०२०पासून उच्च माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात येत आहे. याचसोबत मंडळ पाठ्यपुस्तकावर आधारित स्वाध्यायपुस्तिका व पाठ्येतर पूरकसाहित्य तयार करते.
- (अ) **पाठ्यपुस्तकांचे हस्तलिखित व प्रकाशनपूर्व प्रक्रिया:** शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके, स्वाध्यायपुस्तिका व इतर शैक्षणिक साहित्ये यांची निर्मिती करण्याच्या कामात राज्याच्या विविध भागांतील शिक्षकांची तसेच शिक्षणतज्ज्ञांची मदत घेतली जाते. त्यासाठी मंडळात प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, विषयतज्ज्ञ इत्यादींच्या विषयवार सभा, कार्यशाळा इत्यादी आयोजित करण्यात येतात. भाषेतर विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तकांच्या मराठी विषयांच्या प्रती अंतिम केल्यानंतर उर्वरित नऊ भाषा माध्यमांना भाषांतरासाठी देण्यात येतात. मंडळाचे विद्या विभागातील विशेषाधिकारी या तज्ज्ञांच्या मदतीने पाठ्यपुस्तकाचे लेखन-संपादन करून त्याला अंतिम स्वरूप देतात. नव्याने लेखन करून संपादित केलेला आशय हे भाषेतर पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य होय.
- पाठ्यपुस्तके निर्दोष व दर्जेदार होण्याकरिता विद्या विभागातर्फे पाठ्यपुस्तकांच्या चाचणी प्रती तयार झाल्यानंतर त्या चाचणी प्रतींचे शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर संबंधित

व्यक्तींकडून समीक्षण व गुणवत्ता परीक्षण करून घेतले जाते. पुस्तकांच्या चित्रांकनासाठीही मंडळाने आतापर्यंत अनेक ख्यातनाम चित्रकारांचे सहकार्य घेतले आहे. सर्व शैक्षणिक साहित्य निर्दोष व दर्जेदार असावे तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वेळेवर उपलब्ध व्हावीत यासाठी सर्व प्रयत्न केले जातात.

- **(ब)** पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीबरोबरच पाठ्येतर साहित्याची निर्मिती मंडळ करते. मंडळामार्फत विक्री करण्यात येणाऱ्या पाठ्येतर साहित्याची यादी मंडळाच्या सर्व विभागीय भांडारांमध्ये उपलब्ध आहे.
- **(क) मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिलीपासून इंग्रजी:** महाराष्ट्र शासनाने डिसेंबर १९९९मध्ये मराठी माध्यमातील शाळांसाठी इंग्रजी विषय इयत्ता पहिलीपासून शिकवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी करताना मंडळाने इयत्ता पहिलीचे पाठ्यपुस्तक जून १९९९पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी अल्पावधीतच उपलब्ध करून दिले. त्यानंतर इयत्ता बारावीपर्यंतची पाठ्यपुस्तके क्रमश: प्रकाशित करण्यात आली आहेत. इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषयाची यशस्वी सुरुवात करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिलेच राज्य आहे.
- **(ड)** अमराठी शाळांतील विद्यार्थ्यांना पहिलीपासून मराठी शिकवण्याच्या शासनाच्या निर्णयाला अनुसरून मंडळाने अमराठी शाळांतील विद्यार्थी व शिक्षक यांकरिता इयत्ता पहिली व दुसरीसाठी 'मजेत शिकूया मराठी' ही चित्रपुस्तिका व इयत्ता तिसरी व चौथीकरिता 'मराठी सुलभभारती' ही पाठ्यपुस्तके क्रमश: प्रकाशित करण्यात आली आहेत.
- नवीन शिक्षण धोरण २०२०आधारित पायाभूत स्तर २०२४वर आधारित शालेय वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता पहिलीची नवीन पाठ्यपुस्तके पाठ्यपुस्तक मंडळामार्फत तयार करण्यात आली आहेत.
- शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२५/प्र.क्र.९४/एस.डी./४ दिनांक १४ जुलै २०२५नुसार शालेय वर्ष २०२६-२७ करिता इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी व सहावीच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती पाठ्यपुस्तक मंडळामार्फत करण्यात येत आहे.

## ६. निर्मिती विभाग

पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे कार्यालय प्रभादेवी, मुंबई येथे आहे. निर्मिती विभागाचे प्रमुख म्हणून नियंत्रक हे काम पाहतात.

विद्या विभागाकडून पाठ्यपुस्तकांची अंतिम मुद्रणप्रत प्राप्त झाल्यानंतर निर्मितीपूर्व सर्व प्रक्रिया पूर्ण करून पुस्तकांची छपाई करणे व पाठ्यपुस्तके उपलब्ध करुन देणे, तसेच पुनर्मुद्रणाच्या अधिप्रमाणित प्रतीमध्ये दर्शवलेल्या दुरुस्त्या सुधारुन पुस्तकांची छपाई करणे व पुस्तके उपलब्ध करुन देणे हे निर्मिती विभागाच्या कामाचे मुख्य स्वरुप आहे.

पुस्तक निर्मितीमध्ये अनेक प्रक्रिया कराव्या लागतात. नव्याने प्रकाशित करावयाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पुस्तकाची अक्षरजुळणी, लेआऊट, डिझाईन, चित्राकृती, नकाशा, मुखपृष्ठ व प्रोसेसिंग इत्यादी बाबी निर्मिती विभाग व विद्या विभाग यांचे समन्वयाने करण्यात येतात.

अक्षरजुळणी करण्यापूर्वी मुद्रण प्रतींवर (हस्तलिखित) मजकुराच्या टाईपाचा प्रकार व आकार, शीर्षकांचा व मुख्य मजकुराचा टाईप, कोणत्या आकारात व किती कॉलममध्ये जुळणी करावयाची याबाबतच्या तांत्रिक स्वरुपाच्या सूचना नमूद करुन हस्तलिखित संगणकावर जुळणी करण्याकरिता देण्यात येते. मराठी, इंग्रजी, व हिंदी या ३ भाषेची जुळणी मंडळाच्या संगणक विभागामार्फत करण्यात येते. उर्दू, गुजराती, कन्नड, बंगाली, तमीळ, सिंधी व तेलुगु या भाषांतील पुस्तकांच्या मजकुरांची जुळणी बाहेरील संस्थेकडून करुन घेण्यात येते. जुळणी झाल्यानंतर प्राप्त होणारी मुद्रिते वेळोवेळी मुद्रित शोधन विभागाकडून तसेच विद्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येतात. प्रत्येक तपासणीनंतर त्यातील दुरुस्त्या सुधारुन सुधारित मुद्रिते पुनश्च तपासणीसाठी देण्यात येतात. **दरम्यानच्या काळात चित्राकृती तयार करुन त्याचा अंतर्भाव पुस्तकांमध्ये करुन पृष्ठरचना करण्यात येते.** चित्रांचा समावेश झाल्यानंतर पुनश्च मुद्रिते तयार करुन ती तपासण्यात येतात. पुस्तकामध्ये कोणत्याही प्रकारची चूक राहू नये म्हणून मुद्रितांची तपासणी साधारणपणे ३ ते ४ वेळा करण्यात येते. मजकूर व चित्रे अंतिम झाल्यानंतर ती प्रोसेसिंगसाठी देण्यात येतात. तसेच पुस्तकाचे मुखपृष्ठही तयार करुन ते प्रोसेसिंगसाठी देण्यात येते. त्यानंतर पुस्तकाची सीडी तयार करुन छपाई यंत्रावर नमुना प्रत (यंत्रमुद्रिते) तयार करुन ती संबंधित विशेषाधिकारी यांचेकडून तपासण्यात येतात आणि त्यामध्ये काही चूक आढळून आल्यास ती दुरुस्त करुन व विद्या विभागाकडून छपाईस अंतिम मान्यता मिळाल्यानंतर पुस्तकाची अंतिम छपाई करण्यात येते.

पुनर्मुद्रण करावयाच्या पुस्तकांकरता विद्या विभागाकडून प्राप्त होणाऱ्या अधिप्रमाणित प्रतींनुसार दुरुस्त्या सुधारुन त्यास विद्या विभागाची मान्यता घेऊन पुस्तकांची छपाई करण्यात येते.

शालेय वर्ष २०१२-२०१३ पासून मंडळाने नव्याने विकसित झालेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पाठ्यपुस्तकांची छपाई सीटीपी तंत्रज्ञानाद्वारे सुरु केली आहे. त्यामुळे पुस्तकांच्या छपाईसाठी मुद्रणालयास पीडीएफ फाईल देऊन पुस्तकांची छपाई करण्यात येते.

मंडळामार्फत इ. १ ली ते इ. ८ वी या इयत्तांची १० भाषांतील, इ. ९ वी व इ. १० वी या इयत्तांची आठ भाषांतील तसेच इ. ११ वी व इ. १२ वी या इयत्तांच्या कला व वाणिज्य शाखेकरता दोन भाषातील व विज्ञान शाखेच्या इंग्रजी भाषेतील पुस्तकांची छपाई बांधणी करुन पुस्तके उपलब्ध करुन देण्यात येतात. मंडळाची सर्व पाठ्यपुस्तके ही 'अ-४' या आकारातील असून सदर पाठ्यपुस्तके बहुरंगी करण्यात आलेली आहेत. सदर पाठ्यपुस्तके वेळेत व माफक किंमतीत विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जातात.

पाठ्यपुस्तकांच्या छपाई-बांधणीचे काम प्रत्येक वर्षी ई-निविदा मागवून सुमारे १५० मुद्रणालयांकडून करुन घेण्यात येते. मुद्रणालयास छपाईसाठी सोपवण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तकांची सीडी व नमुना प्रत निर्मिती विभागामार्फत मुद्रणालयास देण्यात येतात. मुद्रणालयाकडे सोपवण्यात आलेल्या छपाई-बांधणी कामावर नियंत्रण ठेवून पाठ्यपुस्तकांच्या छपाई-बांधणी कामाची प्रगती निर्मिती विभागामार्फत करण्यात येते. आवश्यकता भासल्यास मुद्रणालयास प्रत्यक्ष भेट देण्यात येते. मुद्रणालयांकडून छपाई-बांधणी झालेली पुस्तके मंडळाच्या विभागीय भांडारात प्राप्त होतात. विभागीय भांडारात प्राप्त होणाऱ्या पुस्तकांची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करण्यात येते. सदर

तपासणीमध्ये छपाई–बांधणीची सदोष पुस्तके आढळून आल्यास ती जप्त करण्यात येऊन निर्दोष पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येतात.

## ७. संशोधन विभाग

पाठ्यपुस्तक मंडळाच्या नामाभिधानात नमूद केल्याप्रमाणे अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यांवर आधारित शैक्षणिक संशोधन प्रकल्पांचे काम हाती घेतले जाते. पाठ्यपुस्तक मंडळात यासाठी स्वतंत्र संशोधन विभाग आहे. पाठ्यपुस्तक मंडळाच्या संस्थापन समयलेखातील तदतुदींनुसार संशोधन सल्लागार परिषद, तसेच या परिषदेची उपसमिती काम करते.

**संशोधन प्रकल्प आर्थिक साहाय्य योजना :**

राज्यात शैक्षणिक संशोधनाचे वातावरण निर्माण व्हावे, पाठ्यपुस्तक मंडळालाही या संशोधन प्रकल्पांचा उपयोग शैक्षणिक साहित्य निर्मितीमध्ये करून घेता यावा याकरिता पाठ्यपुस्तक मंडळाने 'संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजना' तयार केली आहे. या योजनेची कार्यवाही १९७० पासून सुरु आहे. या योजनेअंतर्गत विविध शैक्षणिक संशोधन प्रकल्प वैयक्तिक स्तरावर व संस्था स्तरावर हाती घेण्यात येतात. वैयक्तिक स्तरावरील प्रकल्पासाठी व संस्था स्तरावरील प्रकल्पासाठी संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजनेअंतर्गत अनुदान देण्यात येते. आतापर्यंत विविध शैक्षणिक विषयांवर एकूण ९६७ शैक्षणिक संशोधन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.

## ८. पाठ्यपुस्तकांचे वितरण

प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक स्तरांवरील प्रत्येक विषयाची दहा माध्यमांतून पाठ्यपुस्तके छपाई केली जातात. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये मुद्रण–पुनर्मुद्रण छपाई कार्यक्रमातंर्गत इयत्ता १ ली ते १२ वीच्या एकूण ८२१ शीर्षकांसाठी एकूण ८.१७ कोटी पाठ्यपुस्तकांची छपाई करण्यात आलेली आहे. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० प्रमाणे तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी राज्यातील सर्व शाळांमध्ये सर्व संबंधीत विभागामार्फत सन २०२५–२६ पासून टप्प्याटप्याने करण्यात येत आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये इयत्ता १ लीची पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित करण्यात आलेली आहे.

राज्यातील खाजगी व विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तक मंडळाच्या ९ विभागीय भांडारामार्फत पाठ्यपुस्तके खुल्या विक्रीसाठी उपलब्ध करून दिली जातात. तसेच पाठ्येत्तर पुस्तकांची भांडारातून विक्री केली जाते. **पाठ्यपुस्तकांवर १५% व पाठ्येतर पुस्तकांवर २०% ते ५०% पर्यंत वटाव** दिला जातो.

पाठ्यपुस्तकांच्या वितरणाचे काम योजनाबद्ध रितीने आणि कार्यक्षम पद्धतीने व्हावे, यासाठी पाठ्यपुस्तक मंडळाने सुरुवातीपासून विहित कार्यपध्दतीनुसार वितरणाची एक निश्चित अशी पद्धत तयार केलेली आहे.

पाठ्यपुस्तकांच्या वितरणासाठी मंडळाची एकूण ९ विभागीय भांडार गोरेगाव (मुंबई), पनवेल, पुणे, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, छ.संभाजीनगर, लातूर व अमरावती हे आहेत. प्रत्येक

शैक्षणिक वर्षाकरिता छपाई कार्यक्रमानुसार मुद्रकांकडून पाठ्यपुस्तकांची आवश्यकतेनुसार छपाई केली जाते. सदरची छपाई केलेली पाठ्यपुस्तके मंडळाच्या नजीकच्या विभागीय भांडारात पोहच केली जातात. तद्नंतर मंडळाच्या सर्व विभागीय भांडारात पाठ्यपुस्तकांच्या गतवर्षीच्या विक्रीनुसार तसेच संबंधित भांडाराच्या मागणीप्रमाणे मुख्यालयाच्या स्थलांतर आदेशानुसार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जातात. त्यानुसार मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रेते, शैक्षणिक संस्था, पालक, विद्यार्थी व इतर संबंधितांना पाठ्यपुस्तकांची व पाठ्येतर पुस्तकांची विक्री केली जाते. याशिवाय मुंबई व ठाणे जिल्ह्यातील विक्री व वितरण सुलभ व्हावे, यासाठी पाठ्यपुस्तक मंडळाने दोन सहकारी वितरण संस्थांची नियुक्ती केलेली आहे. तसेच विश्वकोश मंडळाचे विश्वकोश खंड क्रमांक १ ते २० तसेच विश्वकोशाच्या सी.डी.ची विक्री पाठ्यपुस्तक मंडळामार्फत केली जाते.

पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारातून अधिकृत पुस्तक विक्रेते, शैक्षणिक संस्था पुस्तकांची मागणी नोंदवतात व याप्रमाणे पाठ्यपुस्तकांची खरेदी करतात. अशा रितीने या अधिकृत पुस्तक विक्रेत्यांमार्फत शासकीय योजनांशिवाय खाजगी व विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांचे वितरण होत असते. मंडळाकडे **सुमारे ६५१** पुस्तक विक्रेत्यांनी अधिकृत पुस्तक विक्रेते म्हणून मंडळाच्या जवळच्या भांडारात नोंदणी केलेली आहे. याशिवाय **सुमारे** ९५० शैक्षणिक संस्थांनी नोंदणी केलेली आहे. या सर्वांमार्फत पुस्तकांची खुल्या बाजारात विक्री होत आहे.

पाठ्यपुस्तकांच्या विक्री व वितरणासाठी मंडळाची स्वतंत्र नियमावली आहे. त्यानुसार राज्यातील कोणत्याही अधिकृत पुस्तक विक्रेत्यास **अधिकृत पुस्तक विक्रेते** म्हणून नाममात्र नोंदणी शुल्क मंडळाकडे जमा करून व अनामत रक्कम मंडळाकडे ठेवून प्रत्येक वर्षाच्या मार्चपर्यंत नोंदणी करता येते.

पाठ्यपुस्तकांचे **थेट पद्धतीने देखील** वितरण व्हावे यासाठी राज्यातील **शैक्षणिक संस्थांना** मंडळाच्या ९ विभागीय भांडारातूनही पुस्तकांची खरेदी करण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी नाममात्र नोंदणी शुल्क जमा करून या संस्थांना मंडळाच्या ९ विभागीय भांडारांमध्ये आपली नोंदणी करता येते. अशा शैक्षणिक संस्थांना पाठ्यपुस्तकांचा पुरवठा अग्रक्रमाने करण्यात येतो. तसेच त्यांना पाठ्यपुस्तकांच्या **किंमतीवर १५% वटावही** देण्यात येतो. दरवर्षी खुल्या बाजारात **सुमारे २०० ते २५० कोटी** रुपयांची पुस्तके विकली जातात. तसेच शासकीय योजनांमार्फत **सुमारे ३०० ते ३५० कोटी** रुपयांच्या पाठ्यपुस्तकांचा पुरवठा केला जातो.

- **समग्र शिक्षा मोफत पाठ्यपुस्तक योजना :**

समग्र शिक्षा व पीएमश्री मोफत पाठ्यपुस्तके योजनेतंर्गत राज्यातील सर्व शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, शासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा केला जातो. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी नोंदविलेल्या मागणीप्रमाणे पाठ्यपुस्तकांचा पुरवठा तालुकास्तरावर शालेय वर्ष २००२-२००३ पासून मंडळाच्या विभागीय भांडारांतून शाळा सुरु

होण्यापूर्वी केला जातो. तसेच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयामार्फत पाठ्यपुस्तक पुरवठ्यापोटी हिशोबाच्या खर्चाची पूर्तता केली जाते. व तद्नंतर पाठ्यपुस्तकांच्या पुरवठा केलेल्या देयकांची रक्कम पाठ्यपुस्तक मंडळास दिली जाते. समग्र शिक्षा व पीएमश्री मोफत पाठ्यपुस्तके योजनेतंर्गत पुरवठा होणाऱ्या पाठ्यपुस्तकांचे वितरण शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांचे अंतर्गत संबंधित जिल्हा परिषदांच्या शिक्षणाधिकारी व महानगरपालिकांच्या प्रशासन अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते.

समग्र शिक्षा व पीएमश्री मोफत पाठ्यपुस्तके योजनेतंर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना नियमित पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या पाठ्यपुस्तकांवर समग्र शिक्षा व पीएमश्री मोफत पाठ्यपुस्तके योजनेतंर्गत '**समग्र शिक्षा**' (**विनामूल्य वितरणासाठी**)' अशा आशयाचा लोगो छापण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आलेले आहे.

➢ **कागद खरेदी**

पाठ्यपुस्तक मंडळाला पुस्तकांच्या छपाईसाठी आवश्यक असलेला कागद खुल्या बाजारातून थेट उत्पादकांकडून विहित पद्धतीने अखिल भारतीय स्तरावर **ई-टेंडरींग** पद्धतीने जाहीर निविदा मागून खरेदी करण्यात येतो. शालेय वर्ष २०२५-२०२६ करीता ई-टेंडरींग पद्धतीने निविदा मागविण्यात येऊन क्रीमवोव्ह ७० जीएसएम-१८,००० मे.टन व एम.एफ.कव्हर १७० जीएसएम १,५०० मे.टन असा एकूण १९,५०० मे.टन कागद खरेदी करण्यात आलेला आहे.

## ९. संगणक विभाग :

मंडळाच्या कामकाजात संगणकाचा उपयोग करून घेण्याबाबतचे धोरण मान्य झाल्यानुसार मंडळातील सर्व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. यासाठी सन १९९६-९७ मध्ये संगणक विभागाची निर्मिती करण्यात आली व त्याकरिता ईडीपी मॅनेजर यांची नियुक्ती करून त्यांच्या अधिपत्याखाली मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

याच विभागामार्फत सर्व संगणकीकरण प्रक्रियेत प्रकल्प अहवाल तयार करणे, सिस्टीम स्टडी, सिस्टीम रिक्वायरमेंट, ॲनालिसीस इत्यादी तसेच आवश्यक ती खरेदी, करारनामे, देयक अदायगी इत्यादी बाबी हाताळण्यात येतात व मंडळाच्या सर्व विभागांना तांत्रिक साहाय्य दिले जाते.

मंडळाच्या आस्थापनेवरील तांत्रिक मंजूर कर्मचारी पदे रिक्त असल्याने सदर सर्व कामे ईडीपी व्यवस्थापक, संगणक विभाग यांच्या नियंत्रणात ठेकेदार कर्मचारी/सल्लागार यांच्यामार्फत करून घेण्यात येत आहेत.

**संगणक विभागामार्फत आजपर्यंत करण्यात आलेली कामे –**

१. मंडळाची पुस्तक वितरण व्यवस्था ऑनलाईन करण्यात आली आहे.

२. निर्मिती विभागासाठी ऑर्डर प्रोसेसिंग सिस्टीम मंडळाच्या गरजेनुसार तयार करून कार्यान्वित करण्यात आली आहे.
३. अर्थशाखेसाठी दैनंदिन हिशोब कार्यपद्धती जीएसटी मॉड्युलसहित कार्यान्वित करण्यात आली आहे.
४. पे-रोल व तदनुषंगिक ॲप्लिकेशन मॉड्युल्स उदा. Attendence System, Leave Application, Mediclaim इत्यादी कार्यालयीन कामकाजास उपयोगी पडणारे मॉड्युल्स In-house तयार करून घेऊन सर्व विभागीय कार्यालय व मुख्यालयात कार्यान्वित करण्यात आली आहे.
५. मंडळाच्या सर्व विभागांसाठी आधुनिक संगणक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून मंडळाचे ९०% काम संगणकीकृत करण्यात आले आहे.
६. मंडळाची सर्व प्रकाशने ई-बालभारतीच्या संकेतस्थळावर जनतेस उपलब्ध करून देण्यात आली आहेत.
७. कॉपीराईट पॉलिसी अंतर्गत प्रकाशकांच्या नोंदणी व परवाना अदायगी ऑनलाईन कार्यप्रणाली विकसित करून याच विभागामार्फत त्याबाबतची सर्व कार्यवाही करण्यात येत आहे.
८. किशोर विभागासाठी ऑनलाईन कार्यप्रणाली विकसित करण्यात आली असून त्यांच्या वर्गणीदारांची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आलेली आहे.
९. बदलत्या काळानुसार ई-साहित्य तयार करण्याच्या दृष्टीने “ई-बालभारती” ह्या विभागाची संगणक विभागांतर्गत निर्मिती करण्यात आली असून त्यामार्फत ई-बालभारती नावाने स्वतंत्र ई-लर्निंग साहित्य वितरणासाठी LMS प्लॅटफॉर्म तयार करून घेण्यात आला असून त्यावरून इ.१ ली ते १० चे ई-साहित्य विद्यार्थ्यांना माफक दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे.
१०. NEP धर्तीवर नव्याने तयार होणाऱ्या अभ्यासक्रमावर आधारीत ई-लर्निंग साहित्य विकसित करून विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे.
११. सन २०२६-२०२७ या मंडळाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यातील २०० शाळांसाठी AI तंत्रज्ञानावर अधारित कार्यशाळा आयोजित करुन ऑलिंपियाड घेणे प्रस्तावित आहे.

## १०. मंडळाचे ग्रंथालय

मंडळाचे अतिशय समृद्ध व अद्ययावत असे संदर्भ ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, सिंधी, कन्नड, गुजराती, तेलुगु अशी एकूण आठ भाषांतील सर्व १ लाख ६३ हजार विषयांची पुस्तके आहेत. त्यात काही दुर्मिळ पुस्तके आहेत. तसेच १८३७ सालापासुनची दुर्मिळ पाठ्यपुस्तके संग्रहीत आहेत. त्याशिवाय भारतातील विविध राज्यांतील आणि परदेशांतील क्रमिक पुस्तकेही आहेत. ग्रंथालयात निरनिराळ्या प्रकारचे नकाशे, तक्ते, चित्रे यांचाही संग्रह आहे. तसेच रिस्ट्रिक्टेड, अनरिस्ट्रिक्टेड मॅप्स आहेत आणि रिलीम मॅप्स, सीडी आणि ऑडिओ कॅसेटस् आहेत. ग्रंथालयातील नियतकालिक विभागात निरनिराळ्या विषयांची वरील आठ भाषांतील देशी व परदेशी अशी जवळजवळ ११६ नियतकालिके वर्गणी भरून घेतली जातात आणि १० नियतकालिके भेट म्हणून येतात. ग्रंथालयात सर्व आठ भाषांतील, सर्व विषयांचे विविध प्रकारचे ज्ञानकोश,

विश्वकोश, चरित्रकोश व शब्दकोश इत्यादी विविध संदर्भ ग्रंथ असून संदर्भ विभाग हा अत्यंत समृदध आहे.

दरवर्षी होणाऱ्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी संबंधित समित्यांना, लेखकांना आवश्यक ते संदर्भसाहित्य या ग्रंथालयातून पुरवले जाते. निरनिराळे संशोधकसुद्‌धा या ग्रंथालयाचा उपयोग नियमितपणे करतात. या ग्रंथालयात एकूण १,५४,५९० पुस्तके उपलब्ध आहेत. ग्रंथालयाच्या संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. याशिवाय ग्रंथालयाच्यावतीने विविध मोफत ऑनलाईन रिसोर्सेस उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

ग्रंथालयात संग्रहीत असलेली मंडळाच्या जुन्या मालेतील सर्व पाठ्यपुस्तके व मंडळाच्या स्थापनेपूर्वीच्या जुन्या पाठ्यपुस्तकांचे ३ लाख पृष्ठांचे डिजिटयझेशनचे काम पूर्ण करण्यात आलेले असून आतापर्यंत ३१५६ पुस्तकांच्या ३,५६,४८७ पृष्ठांचे डिजिटायझेशन पूर्ण झालेले आहे. डिजिटायझेशन झालेली मंडळाच्या सर्व मालेतील पाठ्यपुस्तके मंडळाच्या वेबसाईटवर मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

## ११. **‘किशोर मासिक’**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने मराठी भाषक विद्यार्थ्यांची ज्ञान आणि मनोरंजनाची गरज भागवण्यासाठी नोव्हेंबर १९७१ साली बालदिनाच्या सुमुहूर्तावर ‘किशोर’ मासिकाच्या निर्मितीला प्रारंभ केला. मासिकाच्या ५५ वर्षांच्या वाटचालीत बालमासिकाच्या क्षेत्रातील एक अग्रेसर मासिक म्हणून आज ‘किशोर’ची ओळख आहे. कथा, कविता, व्यंगचित्रे, विज्ञानविषयक लेखन व माहिती, विनोद, खेळ, छंद असे विविध प्रकारचे साहित्य किशोरमधून प्रसिद्‌ध केले जाते.

किशोर मासिकाच्या दिवाळी अंकांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांत आतापर्यंत उत्कृष्ट बालमासिक गटातील ७५ पारितोषिके मिळाली आहेत. त्यातील खालील काही उल्लेखनीय आहेत.

(१) किशोर, मार्च १९७३ – माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, छपाई आणि सजावट राज्यपुरस्कार – श्रेष्ठता प्रमाणपत्र.

(२) किशोर नोव्हेंबर, १९७६ - माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, छपाई आणि सजावट राज्यपुरस्कार – प्रथम पुरस्कार.

(३) किशोर, दिवाळी २००३ – मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई, उत्कृष्ट संपादन– केशवराव कोठावळे पुरस्कार.

(४) जानकीबाई केळकर उत्कृष्ट बालवाड्.मय पुरस्कार – महाराष्ट्र साहित्य परिषद २०१६

(५) उत्कृष्ट दिवाळी अंक (बालवाड्.मय) तसेच उत्कृष्ट मुखपृष्ठ, किशोर दिवाळी २०२२, २०२३ - छंदश्री दिवाळी अंक स्पर्धा.

(६) उत्कृष्ट दिवाळी अंक (बालवाड्.मय) किशोर दिवाळी २०२२, २०२३ - रोटरी (पुणे)

## सर्जनशील तसेच नव्या लेखकांना संधी–

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्जनशील तसेच नवोदित लेखक कवींना किशोरमध्ये संधी उपलब्ध करून दिली जाते. याकरिता गुणवत्ता हा एकच निकष मानण्यात येतो. ज्येष्ठ कवी गुलजार, जयंत नारळीकर, अनिल अवचट, दिलीप प्रभावळकर, महावीर जोंधळे,अच्युत गोडबोले, बाळ फोंडके, मंगला गोडबोले, डॉ. नीलिमा गुंडी, राजन खान, प्रवीण दवणे, राजीव तांबे, पंडित विद्यासागर, मुकुंद टाकसाळे, संजय भास्कर जोशी, अरुण म्हात्रे, दासू वैद्य, श्रीकांत बोजेवार, मुकेश माचकर, प्रदीप आगलावे, नामदेव माळी, फारूक काझी,संतोष पद्माकर पवार, इंद्रजित भालेराव, कल्पना दुधाळ, डॉ. प्रदीप आवटे,पृथ्वीराज तौर, स्वाती राजे, शंतनू अभ्यंकर, ऐश्वर्य पाटेकर यांच्यासारख्या सर्जनशील व नावाजलेल्या लेखकांबरोबरच अनिल साबळे, राजकुमार तांगडे, वीरा राठोड, मनोज बोरगावकर, शिल्पा कांबळे, अवधूत डोंगरे, मृणालिनी वनारसे, संजय वाघ, संजय चौधरी, वसीमबारी मणेर, गणेश आघाव, पुनीत मातकर, हनुमंत चांदगुडे यासारख्या नव्या दमाच्या लेखकांपर्यंत हा प्रवास सुरू आहे.

## किशोर अंकाची आकर्षक मांडणी–

किशोर अंकात उत्तम आशयाबरोबरच मांडणीही आकर्षक पद्धतीने करण्यात येते. मुलांना भावेल या पद्धतीचे अंकाच्या ले आउट डिझाइन करण्यात येते. अलीकडच्या काळात चंद्रमोहन, चारुहास पंडित, अन्वर हुसेन, रेश्मा बर्वे,डॉ. सुहास सरवदे, पंकज झरेकर, भार्गवकुमार कुलकर्णी, मकरंद लांजेवार,अमर काळे, फारुख नदाफ, आलोक निरंतर या प्रसिद्ध कलाकारांनी किशोरची मुखपृष्ठे सजवली आहेत. तर दीपक संकपाळ, घनशाम देशमुख,राजेंद्र गिरिधारी अंबिका करंदीकर, धनश्री केळकर, अजय विभुते, योगिता धोटे, माधुरी भोसले,निकिता वैद्य आदी चित्रकारांनी किशोरकरिता रेखाटने केली आहेत. सुलेखनकार अमृता ढगे यांच्या कुंचल्यातून किशोर अंकातील लिखाणाची शीर्षके सजवण्यात येतात. आर्ट स्कुलमधून नव्याने बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना किशोरशी जोडून घेण्यात येते. त्यामुळे ताजी आणि नव्या काळाशी सुसंगत चित्रे किशोरमधून प्रसिद्ध होतात.

मंडळाने नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मशताब्दीनिमित्त, तसेच भारतीय स्वातंत्र्याची पन्नास वर्षे अशा प्रसंगानुरूप ‘किशोर’च्या विशेषांकांची निर्मिती केली आहे. कारगिल युद्धाच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट १९९९ या महिन्यात ‘किशोर’च्या राष्ट्रतेज विशेषांकाचे प्रकाशन मंडळाने केले. देशभक्ती विशेषांक, लोककथा विशेषांक, नाट्य विशेषांक, सुट्टी विशेषांक प्रकाशित केले असून या अंकास सर्व स्तरांवरून उत्तम प्रतिसाद मिळाला व अतिशय चांगल्या प्रतिक्रया व्यक्त करण्यात आल्या. मा.पंतप्रधानांनी सुरु केलेल्या स्वच्छता अभियानास प्रतिसाद देत डिसेंबर २०१४ चा अंक स्वच्छता विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला गेला.

१९७१–२०११ या ४० वर्षांच्या वाटचालीत किशोर अंकात प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट साहित्याचे ‘निवडक किशोर’ या स्वरूपात १४ खंड प्रसिद्ध करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मंडळाने हाती घेतला. त्याप्रमाणे कथा, कविता, कादंबरिका (भाग १ व २), दीर्घ कथा, गंमतगाणी, ललित, ललित (सृष्टी), छंद, चरित्र (भाग १ व २), विज्ञान, लोककथा (देश–देशांतर), एकांकिका हे चौदा खंड प्रकाशित झाले आहेत.

**निवडक ५० किशोर गोष्टी –** या संपादित पुस्तकात किशोर मासिकात प्रकाशित झालेल्या सर्वोत्तम कथांचा समावेश करण्यात आला आहे. या मालिकेतील निवडक २५ कथांचा खंड १ प्रकाशित करण्यात आला असून मंडळाच्या सर्व विभागीय भांडारात ते विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

किशोरचे पहिल्या अंकापासूनचे संपूर्ण डिजिटायझेशन झाले असून मागील ५३ वर्षांतील सर्व अंक https://kishor.ebalbharati.in/Archives/ या संकेतस्थळावर ऑनलाईन वाचनाकरिता व डाउनलोडकरिता मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

आजमितीला ‘किशोर’ मासिकाचे दरमहा वितरण सरासरी ७६,००० प्रतींचे आहे. शासनाने मान्य केलेल्या प्रस्तावानुसार राज्यातील सुमारे ६२,००० जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना किशोर मासिक पाठवण्याची कार्यवाही जानेवारी २००१ पासून करण्यात येत आहे.

किशोर अंकाची छपाई चाररंगी असून एकूण ५२ पानांच्या अंकाची किंमत रु.७/- आहे. दिवाळी अंक हा ऑक्टोबर-नोव्हेंबरचा जोडअंक असतो. वार्षिक वर्गणी रु.८०/- असून वेगळा टपाल खर्च आकारला जात नाही. माहे मे २०१२ च्या अंकापासून किशोरमध्ये स्वतंत्र इंग्रजी विभाग सुरु करण्यात आला असून मुलांना अवांतर वाचनाबरोबरच स्पर्धा परीक्षा व अन्य वेगवेगळ्या क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी नवनवीन सदरांचा समावेश करण्यात आला आहे.

❑❑❑

२७/०८/२०२६

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, बालभारती सेनापती बापट रोड, पुणे – ४११ ००४
## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

| नागरी सनद – १ | | |
|---|---|---|
| १. **सेवेचे नाव** | - | मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, व्यक्ती, संस्था , मंडळ, कंपनी, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण संस्था/शाळा, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रेते/अधिकृत शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता व नोंदणी क्रमांक देणे. |
| २. **आवश्यकता** | - | मंडळाच्या विभागीय भांडारांतून विविध पुस्तक विक्रेते, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा/ शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा पुस्तक विक्रेते यांनी मंडळाची पाठ्यपुस्तके १५% वटावासह वेळेत मिळण्यासाठी, तसेच या शैक्षणिक संस्थाना वटाव दराची रक्कम तात्काळ मिळण्यासाठी या पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था यांनी मंडळाच्या विभागीय भांडारांत अधिकृत पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था म्हणून नोंदणी करणे आवश्यक असते. |
| ३. **मंडळाच्या कोणत्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** | - | पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावली १ एप्रिल २०१९ अनुसार. |
| ४. **कोणाशी संपर्क साधावा.** | - | पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल येथील मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी. |
| ५. **अर्जासोबत जोडायची कागदपत्रे.** | - | पाठ्यपुस्तक मंडळ सुधारित नियमावली (१ एप्रिल, २०१९ पासून) नियम व अटीनुसार, मंडळाच्या विभागीय भांडारांतून आवश्यक ते शुल्क, अटीनुसार मुदत ठेव पावतीसह खालील मूळ कागदपत्रांची पूर्तता करावी. शैक्षणिक संस्था/ आदिवासी कल्याण आश्रमशाळा/ शासकीय संस्था/ महानगरपालिका/ महानगरपरिषद/ ग्रामपंचायत/जिल्हा परिषद शाळा/संस्था इत्यादींसाठी अधिकृत शैक्षणिक संस्था म्हणून मंडळाच्या विभागीय भांडारांत केव्हाही नोंदणी करता येते. पुस्तक विक्रेते यांच्यासाठी 'अधिकृत पुस्तक विक्रेता' म्हणून नोंदणी करण्यासाठीचा कालावधी १ सप्टेंबर ते ३१ मार्च असा आहे. यासाठी करायचा अर्ज त्या त्या भांडारांत २ प्रतींत उपलब्ध आहे. त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. |
| | - | शॉप ॲक्टचे प्रमाणपत्र (सध्याचे) (नुतनीकरणासह). |
| | - | मंडळाकडून प्राप्त झालेला विहित नमुन्यातील अर्ज (दोन प्रतींत). |
| | - | शहर, गाव, महानगर येथील गावात/शहरात कायम रहिवासी असल्यासंदर्भातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे. |
| | - | अर्जासोबत रु. १००/– (अक्षरी रुपये शंभर फक्त) कोर्टाच्या स्टँम्पवर मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रेते म्हणून प्रसृत केलेली नियमावली मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटराइज्ड). |
| | - | अधिकृत पुस्तक विक्रेता नोंदणी शुल्क रु. १०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त) व अनामत रक्कम रु. ५०००/– जमा केल्याची पावती. |
| | - | आपण एखाद्या पुस्तक विक्रेत्या संघटनेचे सभासद असाल तर त्या संघटनेचे नाव/पत्ता. |
| | - | भागीदारीची संस्था असेल तर भागीदारांची नावे, पत्ते, भागीदारीची प्रमाणित केलेली खरी नक्कलप्रत व पार्टनरशिप प्राप्त नोंदणी क्रमांक. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **अर्ज कोठे सादर करावा.** | - विभागीय भाडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल |
| ७. | **अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी** | - ४५ दिवस |
| ८. | **विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | - मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती',<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४ |

# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, बालभारती सेनापती बापट रोड, पुणे – ४११ ००४
## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

| नागरी सनद – २ | | |
|---|---|---|
| १. **सेवेचे नाव** | - | मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, दुर्गम भागांतील शाळा, प्राथमिक/ माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना मंडळाच्या अधिकृत पाठ्यपुस्तकांची विक्री करण्यात आल्यानंतर जर त्या पाठ्यपुस्तकांमध्ये बांधणीदोष/मुद्रणदोष आढळल्यास सदर पुस्तकांच्या प्रती परत घेण्यात येऊन संबंधितांना उत्तम छपाईच्या निर्दोष प्रती विनामोबदला बदलून देणे. |
| २. **आवश्यकता** | - | मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना पाठ्यपुस्तक मंडळाच्या अधिकृत क्रमिक पुस्तकांची विक्री केल्यानंतर त्यांतील काही प्रती विद्यार्थी–पालक शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्याकडे जातात. अशी सदोष पुस्तके विद्यार्थ्यांना वापरण्यास उपयुक्त ठरत नाहीत. त्यामुळे पालकांना नवीन पाठ्यपुस्तके विकत घेण्यासाठी विनाकरण आर्थिक भुर्दंड पडतो. अशा प्रकारची पुस्तके विनामोबदला व त्वरित बदलून देणे, ही मंडळाच्या ध्येय–धोरणात नमूद करण्यात आलेली बाब आहे. त्यामुळे पालकांना नवीन पुस्तके खरेदीचा भुर्दंड बसत नाही. ज्या विक्रेत्याकडून अशा प्रती विकत घेतल्या गेल्या असतील त्या त्याने ग्राहकांना बदलून देणे, बंधनकारक आहे. तरीही अशा प्रती त्यांच्याकडून बदलून न मिळाल्यास मंडळाच्या भांडारांमधून ग्राहकांना अशा प्रती बदलून दिल्या जातात. जे अधिकृत पुस्तक विक्रेते पुस्तकांच्या सदोष प्रती भांडारात जमा करतील; परंतु त्याऐवजी पुस्तके बदलून नेणार नाहीत, त्यांच्या नावे खराब प्रतींच्या दर्शनी किमतीची माल आवक पावती तयार करून विक्रेत्याच्या खाती निव्वळ रक्कम जमा करण्यात येते. पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था यांनी मंडळाच्या विभागीय भांडारांत अधिकृत पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था म्हणून नोंदणी करणे आवश्यक असते. |
| ३. **मंडळाच्या कोणत्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** | - | पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावली १ एप्रिल २०१९ अनुसार. |
| ४. **कोणाशी संपर्क साधावा.** | - | पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल येथील<br>मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी. |
| ५. **अर्ज कसा करावा/त्यासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत.** | - | अर्ज संबंधित भांडार व्यवस्थापक यांच्या नावे लिखित स्वरुपात करावा. त्यासोबत पुस्तक खरेदीच्या पावतीची झेरॉक्स व सदोष प्रतींबाबतचा तपशील दयावा. चुकीच्या पुस्तकांच्या पुरवठयाबाबत तक्रारी, पुरवठा केलेल्या दिनांकापासून २१ दिवसांत स्वीकारण्यात येतील. |
| ६. **अर्ज कोठे सादर करावा.** | - | विभागीय भाडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल |

| | |
|---|---|
| ७. **सेवा मिळण्याचा कालावधी** | - १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत विकलेल्या काही प्रतींमध्ये जर मुद्रणदोष/बांधणीदोष आढळून आल्यास अशा सदोष प्रती अधिकृत पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था/ पालक व विद्यार्थी यांना संबंधित भांडारातील पुस्तक विक्रीचा हंगाम कालावधी संपल्यानंतर १५ दिवसात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत भांडारांतून बदलून दिल्या जातील. |
| ८. **विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | - मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती',<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४ |

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.
## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

| नागरी सनद –३ | |
|---|---|
| १. **सेवेचे नाव** | - मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था/शाळा, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना सर्वोत्म दर्जाची पाठ्यपुस्तके वेळेत तसेच रास्त किमतीत उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे. 'ना नफा ना तोटा' या तत्वावर पुस्तके उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे. महाराष्ट्र राज्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व मुलांमुलींना शिक्षणासाठी आठ भाषांतील दर्जेदार पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध करुन दिली जातात. इयत्ता ९ वी ते १२ वीची पाठ्यपुस्तके छापून वितरित केली जातात. |
| २. **आवश्यकता** | - मंडळाच्या विभागीय भांडारांतून विविध पुस्तके प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी आश्रमशाळा यांना उत्तम दर्जाची व रास्त किमतीत पुस्तके मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण भागांतील पालक/विद्यार्थी/शैक्षणिक संस्थाना ही पुस्तके सुलभतेने विकत घेता आली पाहिजेत, अशा दृष्टीने पाठ्यपुस्तकांचा दर्जा उत्तम प्रतीचा व किंमत रास्त ठेवणे योग्य ठरते. |
| ३. **मंडळाच्या कोणत्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** | - पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावली १ एप्रिल २०१९ अनुसार. |
| ४. **कोणाशी संपर्क साधावा** | - पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल येथील<br>मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी. |
| ५. **अर्ज कसा करावा/अर्ज किती प्रतींत करावा** | - संबंधित भांडारात छापील अर्ज उपलब्ध आहे. तो दोन प्रतींत सादर करावा. |
| ६. **अर्ज कोठे सादर करावा** | - विभागीय भाडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल |
| ७. **सेवा मिळण्याचा कालावधी** | - पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार त्वरित |
| ८. **विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा** | - मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती',<br>सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ००४ |

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.

| नागरी सनद – ४ | |
|---|---|
| १. **सेवेचे नाव** | - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते यांना पाठ्यपुस्तकांप्रमाणेच अनेक शिक्षणोपयोगी पूरक साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. त्यामध्ये पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिली जातात. सर्व पाठ्येत्तर साहित्यही उत्तम दर्जाचे व निर्दोष असावे असे साहित्य उपलब्ध करुन देणे. |
| २. **आवश्यकता** | - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते यांना पाठ्यपुस्तकांप्रमाणेच पाठ्येत्तर पुस्तके, शिक्षक हस्तपुसितकेवरुन विषय शिकवणे सुलभ जाते. |
| ३. **मंडळाच्या कोणत्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** | - पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावलीनुसार १ एप्रिल २०१९ अनुसार. |
| ४. **कोणाशी संपर्क साधावा.** | पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल येथील मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी. |
| ५. **अर्ज कसा करावा/अर्ज किती प्रतींत करावा.** | - त्या त्या विभागीय भांडार व्यवस्थापकांच्या नावे लिखित स्वरुपातील अर्ज दोन प्रतींत सादर करावा. |
| ६. **अर्ज कोठे सादर करावा.** | विभागीय भाडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/गोरेगाव/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल |
| ७. **सेवा मिळण्याचा कालावधी.** | - मागणीपत्रकात नमूद केलेल्या पाठ्येतर पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार त्वरित पुरवठा केला जातो. |
| ८. **विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | - मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती',<br>सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ००४ |

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.**

**लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका**

| **नागरी सनद -५** | |
|---|---|
| १. **सेवेचे नाव** | - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था आदिवासी कल्याण आश्रम शाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते व विद्यार्थी यांना पाठ्यपुस्तकांप्रमाणेच पाठ्येतर साहित्यही उपलब्ध करून दिले जाते. त्यापैकी एक 'किशोर' मासिक आहे. बालमासिकांच्या क्षेत्रातील एक अग्रेसर मासिक म्हणून किशोरची ओळख आहे. मराठी भाषिक विद्यार्थ्यांची ज्ञान आणि मनोरंजनाची गरज भागवण्याबरोबरच त्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी किशोर मासिक अल्प किंतीत 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर उपलब्ध करून देणे.<br>- किशोर मासिकात संस्कारक्षम व मनोरंजक कथा, कविता, एकांकिका, आरोग्य,विज्ञान, पर्यावरणविषयक माहिती, थोरांची चरित्रे, आत्मचरित्रे, सामान्य ज्ञान-कोडी, निरनिराळे छंद, क्रीडा, महिन्यातीस प्रासंगिक माहिती असे विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित केले जाते. त्याचबरोबर इयत्ता एक ते चार या प्रथमिक शालेय गटासाठी १६ पानांचा स्वतंत्र बालविभाग असतो. त्यात मुलांमधील निर्मिती क्षमतेला-लेखन व चित्रकलेला वाव देण्यासाठी काही सदरे देण्यात येतात. त्यामध्ये मुलांचे साहित्य व चित्रे प्रकाशित केली जातात.<br>- विद्यार्थ्यांना आवडतील अशी चित्रे, कोडी, विनोद, खेळ यांचा समावेश किशोरमध्ये असल्याने बालगटातील मुलांपासून किशोर गटातील मुले, तसेच शिक्षक व पालकांनाही या मासिकाच्या वाचनाने ज्ञान, माहिती व आनंद मिळतो. संपूर्ण अंक चाररंगी असतो. उत्तम दर्जाची बांधणी असते. दर महिन्याच्या अंकाची किंमत रु.७/- आहे व वार्षिक वर्गणी रु.८०/- आहे. वार्षिक वर्गणीत दिवाळी अंकाचा समावेश असतो. निवडक किशोर खंड १ ते १४ असून संचांची किंमत रु. १६००/- |
| २. **आवश्यकता** | - प्राथमिक व माध्यमिक गटातील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अवांतर वाचनासाठी किशोर मासिक प्रकाशित केले जाते. मासिकातील अनेक सदरे अशी आहेत, की ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या व इतर वाचकांच्या सामान्य ज्ञानात नक्कीच भर पडते. विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी, अकालनक्षमता व ज्ञान वाढण्यासाठी किशोरमधील साहित्याचा उपयोग होतो. ऐतिहासिक व आधुनिक गोष्टींची माहिती, वर्तमानातील घडामोडींची माहिती त्यात दिली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागते. तसेच विद्यार्थ्यांचे साहित्य व चित्रे त्यात प्रकाशित केली जात असल्याने त्यांच्यात लेखनाची व चित्रकलेची आवड निर्माण होते. मुलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असे साहित्य किशोर मासिकात प्रकाशित केले जाते. |
| ३. **कोणाशी संपर्क साधावा** | - मा. संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे, किंवा<br>- कार्यकारी संपादक, किशोर, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| ४. **अर्ज कसा करावा/अर्ज किती प्रतींत करावा.** | - मा. संचालक/ कार्यकारी संपादिका, किशोर मासिक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे यांच्या नावे लेटरहेडवर २ प्रतीत किशोर मासिक मागवण्यासंबंधीचा अर्ज सादर करावा. किशोर मासिकात काही लेख किंवा माहिती, विनोद प्रकाशित करण्यासाठी पाठवायचे असल्यास ते |

| | | |
|---|---|---|
| | | वरील पत्त्यावर पाठवण्यात यावे. सर्व माहितीची छाननी करून/तपासणी करून योग्य ती माहिती प्रकाशित केली जाते. |
| ५. **अर्ज कोठे सादर करावा.** | - | महाराष्ट्र राज्य पाठ्पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४. |
| ६. **सेवा मिळण्याचा कालावधी** | - | 'किशोर' मासिकासंदर्भात काही सूचना केल्या असतील, तर सूचनांची वेळोवेळी दखल घेण्यात येते व पुढील मासिक प्रकाशित करण्यापूर्वी त्यामध्ये काही त्रुटी पाहणार नाहीत याची दखल घेतली जाते. तसेच काही मजकूर/मसुदा/माहिती प्रकाशित करण्यासंबंधी ळवलेले असेल, तर त्याची योग्य प्रकारे छाननी/तपासणी करून योग्य ती माहिती प्रकाशित केली जाते. |
| ७. **सेवा मिळण्याचा कालावधी.** | - | मासिकाच्या उपलब्धतेनुसार त्वरित पुरवठा केला जातो. |
| ८. **विहित कालावधी सेवा न मिळाव्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | - | मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४. |